# मराठी विश्व आयोजित नाट्य महोत्सव २०१४

मला खात्री नव्हती की मी दोन दिवसांत चार नाटके पचवू शकीन. पण, भारतातून आलेल्या नाटकांतील उच्च प्रतिचे लेखन, दिग्दर्शन व अभिनय ह्यामुळे वेळ मजेत गेला. मध्यंतरातील चर्चांवरुन लक्षांत आले की किती विविध दृष्टीकोन असतात आणि त्यांची माझ्या दृष्टीकोनांत वाढ व्हायला मदत होईल. म्हणून तशीच देवाणघेवाण ह्या फेसबूक मार्गे जास्त लोकांशी साधायचा हा प्रयत्न आहे. ही नाटके बघतांना माझा दृष्टीकोन मुख्यत: दिग्दर्शकाचा होता: म्हणजे, माझ्या काय लक्षात आले नाही, मी काय वेगळ्या पध्द्तीने केले असते, मूळ लिखाणांतच काय तूट आहे, ती कशी भरुन काढली, इत्यादि. पण शेवटी, प्रेक्षकांना काय आवडत ते महत्वाचं! म्हणून ते समजून घेण्याचा हा प्रयत्न आहे. मात्र एकमेकांच्या मतावर टीका टाळावी ही विनंती!

<u>मी, रेवती देशपांडे</u>: हे माझ्या मते सर्वात उत्तम नाटक होते. रवी सानेची स्त्रीचे भावनाविष्कार अनुभवायची नाही तर कमीत कमी समजून घेण्याची तीव्र इच्छा लेखकाने सुंदर तऱ्हेने शब्दांत बांधली आहे. तिला मोहन जोशींच्या उत्तम अभिनयाची जोड मिळाल्याने रवी साने बद्दल अतिशय सहानभूती आणि कीव वाटते. तो स्त्रीच्या शरीराचे व तिच्या भावनांचे कौतुक करतो तेंव्हा त्यात लैंगिकतेचा जराही मागमूस नसतो. Gender Identity Crisis ह्या विकृतीची काहीच कल्पना नसल्याने दीपा सानेचे विध्द हृदय, अपमानची भावना व कुचंबणा रेश्मा गोखलेने उत्तम चितारली आहे. माझ्या मते ह्या नाटकाचा उच्चबिंदू म्हणजे सुनेच्या मदतीने मातृत्वाची भावना समजून घेण्याचा रवीचा आग्रही प्रयत्न! ती अनिर्बंध उत्सुकता convincingly व्यक्त करणे साधे काम नाही! Director Kumar Soni did an excellent job with blocking and keeping all the actors engaged - not an easy thing when only one person has a major role. नाटकाचा शेवट मात्र थोडासा तुटक वाटला. “माझ्या संसाराची धूळधाण झाली” ह्या दीपा सानेच्या आक्रोशाला रवीने प्रतिसाद द्यायला हवा होता असे वाटले.

**<u>प्राईस टॅग</u>**: रेवती देशपांडे सारखेच दुसरे सुंदर नाटक. पुन्हा सुंदर लेखन आणि सुंदर अभिनयाचा संगम! पण, माझ्या मते, त्यातील उपदेशीपणा (preachy) मुळे नाटक ह्या दृष्टीने त्याची mass appeal जरा कमी ठरली. मात्र मी काही नवीन techniques  शिकलो. श्री. दीपक करंजीकरांचे आधुनिक कारस्थानी पुढाऱ्याचे (श्री. बराटे) चित्रण एकाच वेळी गमतीदार आणि ominous वाटत होते. शेवटी श्री. बराटेंचा आत्मविश्वास डळमळू लागतो हे एकही शब्द न बोलता श्री. करंजीकरांनी निव्वळ अस्पष्ट अंगविक्षेपा मार्गे छान दर्शविले. स्वानंदी टिकेकरचे काम तडफदार झाले. परंतु त्यात सात्विकतेचा (rightousness) खंबीरपणा जास्त स्पष्ट हवा होता असे वाटले.

**<u>काटकोन त्रिकोण</u>**: ह्या नाटकाची सुरवातच कोकणस्थी विनोदांनी होते. त्यामुळे, आधीच्या गंभीर नाटकावर हा उतारा ठरला. मी भरपूर हासलो. श्री. मोहन आगाशेंचे timing वाखाणण्यासारखे आहे. मात्र लवकरच विनोदांचा ओघ स्त्रियांची चेष्टा करण्याकडे वळला तेंव्हा मला थोडे खटकले. पण आजूबाजूला बघितले तर स्त्रिया सुध्दा हास्यांत सामील झालेल्या दिसल्या. तेंव्हा अधिक काथ्याकूट न करता मीही पार्टीत सामील झालो. तरी पण, लेखकाने केतकी थत्तेला सासऱ्याला उलट टोमणा मारायची एकही संधी देऊ नये ह्याचे खेदाश्चर्य वाटले. असो. दुसऱ्या अंकात नाटकाचे अचानक crime mystery मधे रुपांतर होते. मुलावर आणि सूनेवर वडीलांचा अतघाती मृत्यू घडवून

आणल्याचा आरोप करतात तो फार कृत्रिम वाटतो. पण, कथानकातील ही कमजोरी मोहन आगाशे आपल्या अभिनयाने भरुन काढतात. मात्र पुढे, ह्या आरोपामार्गे, मुलगा आपल्या वडीलाची किती मानसिक अवहेलना करीत आहे हे सिद्ध करण्याचा लेखक प्रयत्न करतो ते स्वीकारणे मला अशक्य होते. त्या अनुषंगाने नेहेमी प्रमाणे तरूण पिढीची कानाउघाडणी होते! त्या वेळी, पहिला अंक किती छान रंगला होता ह्याची आठवण सुध्दा राहात नाही. ओंकारचे काम थोडे फिके पडले असे वाटले. त्याच्या बायको आणि वडीलांशी वागण्यामागे काही सुसंगत मनोवृत्ती असल्याचे दिसत नाही. If nothing else, he could just act superior (शिष्ट). That would be consistent with Inspector Gokhale's accusation at the end that he had written off his father.

<u>कलम ३०२</u>: इथल्या नाट्कांची भारतातील professional नाटकांशी तुलना करणे योग्य (fair) नाही. शिवाय, Theatrix ला हे नाटक अगदी थोड्या वेळात उभे करावे लागले. त्यामुळे नाटकाबद्दल मला काहीच म्हणायचे नाही. पण दोन्ही नटांनी दिग्दर्शक सुध्दा होण्याचे ठरवले हे नाटकाला पोषक ठरले नाही असे मला वाटते. प्रथम म्हणजे ही conflict ची कबूली होती. आणि त्यावर कळस म्हणजे दोघेही स्टेजवर असल्याने, ते project करताहेत ते प्रेक्षका पर्यंत पोहोचते आहे की नाही हे कळायला मार्ग नाही. परिणामी, नाटकाने पकड घेतली नाही. विशेषत: वेषांतराचा महत्वाचा scene फारच फिका पडला. त्यामुळे, "आपल्या घर"चे नाटक असूनही, Curtain Call ला बरेच लोक थांबले नाहीत. याही पेक्षा मूलभूत प्रश्न असा की Taconic Parkway हे यशस्वी नाटक तयार असतांनाही, मराठी विश्वाने घाईने नवे नाटक बसवायचा हेका का धरला? असो.

शरद साठे